## नियमित दिवाणी मुकदमा नंबर १७६/२०२० मधील नि.१३३ वरील आदेश

**१.** प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ ते ८ यांनी हा अर्ज त्यांचेविरुध्द दि.२३.०८.२०१९ रोजी झालेला 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास सक्त हरकत घेतली आहे.

**३.** प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ ते ८ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांना याकामी वादी यांचा उलटतपास घ्यावयाचा होता. परंतु, मार्च २०२० पासून कोव्हीड-१९ या जागतिक रोगराईमुळे लॉकडाऊन असलेने आणि प्रतिवादी क्र.५ यांना अर्धांगवायूचा झटका आलेने त्यांचेवर विटा व कर्नाटक येथील नागरमुनोळी येथे औषधोपचार सुरु असलेने त्याठिकाणी प्रतिवादी यांना वेळोवेळी जावे लागत असलेने त्यांना उलटतपासासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे वेळेत उपलब्ध करुन घेणे अडचणीचे झाले होते. त्यामुळे, त्यांना वादी यांचा उलटतपास घेता आला नाही. सबब, दि.२३.०८.२०१९ रोजी झालेला 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द करणेत यावा, अशी विनंती या प्रतिवादींनी केली आहे.

**४.** वादी यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने स्पष्ट शब्दात नाकारली आहेत. त्यांचे कथनांप्रमाणे त्यांनी दि.२३.०६.२०११ रोजी सरतपास दिला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी उलटतपास न घेतलेने दि.१२.०३.२०१८ रोजी म्हणजेच सात वर्षांनंतर 'उलटतपास नाही' हा आदेश झाला होता. प्रतिवादी यांनी तो आदेश दि.११.०७.२०१९ रोजी रद्द करुन घेतला. परंतु, त्यांनी दंडाची रक्कम न भरलेने दि.२३.०८.२०१९ रोजी पुन्हा त्यांचेविरुध्द 'उलटतपास नाही' हा आदेश झाला. प्रतिवादी यांनी दहा वर्षाचा कालावधी होऊन देखील वादी यांचा उलटतपास घेतलेला नाही. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक चौकशीच्या कामास विलंब केला आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**५.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.बी.कदम व वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला.

**६.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतींचे सरस-निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे. वादी यांनी दि.२३.०६.२०११ रोजी नि.९७ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रतिवादी यांना पुरेशी संधी मिळून देखील त्यांनी वादी यांचा उलटतपास न केलेने त्यांचेविरुध्द दि.१२.०३.२०१८ रोजी 'उलटतपास नाही' असा आदेश झाला होता. प्रतिवादी यांनी नि.१२४ वर अर्ज देऊन तो आदेश र.रु.१,०००/- इतक्या कॉस्टवर रद्द करुन घेतला होता. परंतु, प्रतिवादी यांनी कॉस्टची रक्कम अदा न केलेने दि.२३.०८.२०१९ रोजी पुन्हा त्यांचेविरुध्द 'उलटतपास नाही' हा आदेश करणेत आला आहे. प्रतिवादी यांचे कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.५ यांना अर्धांगवायूचा झटका आलेने त्यांचेवर विटा व कर्नाटक येथील नागरमुनोळी येथे औषधोपचार सुरु असलेने तसेच दरम्यानचे काळात कोव्हीड-१९ या रोगराईमुळे लॉकडाऊन असलेने त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करता आली नाही. प्रतिवादी क्र.४ यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ ॲफिडेव्हीट सादर करुन हे कथन शपथेवर केले आहे. वादी यांचे हरकतीप्रमाणे प्रतिवादी यांनी गेले दहा वर्षे वादी यांचा उलटतपास घेतलेला नाही. परंतु, अभिलेखातील कागदपत्रे पाहिली असता या प्रकरणातील अंतरिम अर्जांचे चौकशीकामी विलंब झालेचे दिसून येते. मार्च २०२० पासून कोरोना महामारीमुळे न्यायालयाचे नियमित कामकाज सुरु नव्हते. वादी यांनी हा दावा वाटपासाठी केला असलेने प्रतिवादी यांना त्यांची बाजू सक्षमरित्या मांडण्याची संधी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी यांचेकडून वादी यांचा उलटतपास घेणेसाठी विलंब झाला असला तरी त्यांना कॉस्ट करुन तो विलंब माफ करता येऊ शकतो. निव्वळ त्या कारणासाठी प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास करणेची संधी न दिलेस प्रतिवादी यांचे बाजू मांडणेचे नैसर्गिक हक्कावर विपरित परिणाम होणार आहे. तसे झालेस

प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांचेविरुध्द दि.१२.०३.२०१८ व नंतर दि.२३.०८.२०१९ रोजी झालेला 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. परंतु, या प्रतिवादींकडून वादी यांचा उलटतपास घेणेसाठी झालेला विलंब पाहता त्यांना र.रु.२,०००/- इतकी कॉस्ट होणे व ती कॉस्ट रक्कम वादी यांना अदा करणे देखील आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः-

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ ते ८ यांनी वादी यांना रक्कम रु.२,०००/- (रुपये दोन हजार मात्र) इतकी कॉस्ट अदा करणेचे अटीवर त्यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी यांनी वादी यांना कॉस्ट रक्कम अदा केलेनंतर त्यांचेविरुध्द दि.१२.०३.२०१८ व नंतर दि.२३.०८.२०१९ रोजी झालेले 'उलटतपास नाही' हे आदेश रद्द करणेत येत आहेत व त्यांना वादी यांचा उलटतपास घेणेस परवानगी देणेत येत आहे.

Sd/-

**दिनांक २४/११/२०२१** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण विटा.** **तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली.**

*Case No : RCS No. 176 of 2020*
*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*
*Name of the Stenographer:S.V.Gaikwad,*
*Court Name: 3rd Jt. Civil & Criminal Court,Vita. Dist. Sangli.*
*Date of decision : 24/11/2021*
*Order signed by P.O.on : 24/11/2021*
*Order uploaded on : 24/11/2021*